**किरकोळ.फौ.ख. क्र.४२१/२०२५**
**प्रेम विरूध्द डेरूअस**

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २२३ अंतर्गत फिर्यादीचे शपथेवर सत्यापन**

**मी प्रतिज्ञेवर कथन करतो ते येणेप्रमाणे,**

माझे नांव - दत्तात्रय वसंत चांदगुडे,
वय- ४७ वर्षे, व्यवसायः- नोकरी,
रा. चिकलसे, कामशेत, ता. मावळ, जि. पुणे.

**०१.** मी प्रेम दरीयानानी यांच्याकडे खाजगी नोकरी करतो. त्यांचे वय आज रोजी ८० वर्ष असून त्यांना आजार असल्याने ते स्वतः न्यायालयात हजर राहू शकत नाही. त्यामुळे मी त्यांच्यातर्फे कुलमुखत्यार दाखल करून आज रोजी माझे शपथेवर सत्यापन नोंदवीत आहे. तसेच मला प्रकरणाची व्यक्तीशः नोकरीस असल्याने संपर्ण माहिती आहे.

**०२.** मी गैरअर्जदार यांना ओळखतो. गैरअर्जदार यांनी प्रेम दरयानानी यांना त्यांची मिळकत ही निरजोखीम व क्लीयर टायटल असल्याचे सांगून खरेदी घेण्यास भाग पाडले. गाव मौजे जोवण, ता. मावळ, जि. पुणे येथील गट क्र. २६८, २८३, ३८६ ही जमीन खरेदी केली आहे. सदर व्यवहाराचा मोबदला हा रू. १९,३५,०००/- ठरलेला होता. त्यापैकी प्रेम दरीयानानी यांनी गैरअर्जदार यांना रू. १८,००,०००/- अदा केलेले आहेत. त्यानंतर आम्ही गैरअर्जदार यांना उर्वरीत मोबदला स्वीकारून आमच्या हक्कात खरेदीखत नोंदवुन देण्याची विनंती केली असता त्यांनी आम्हाला चालढकल केली. शेवटी गैरअर्जदार हे खरेदी देण्यास उत्सुक नसल्याने व टाळाटाळ करीत असल्याने आम्ही आमच्या विधीज्ञामार्फत त्यांना कायदेशीर लेखी नोटीस पाठवीली. त्यानंतर सन २०२४ साली आम्ही महसुल दप्तरी कागदपत्र तपासणी केली असता आमच्या निदर्शनास आले की, गैरअर्जदार यांनी वर नमुद मिळकत ही

शालीनी शेठ व प्रकाश पांडे यांना विक्री केली आहे व आमच्या करारनाम्याचा भंग केलेला आहे. तसेच आमच्याकडुन रू. १८ लाख स्विकारून आम्हाला खरेदीखत नोंदवून न देता ति-हाईत इसमास विक्री करून आमची फसवणुक केली. त्यामुळे आम्ही घटनेची लोणावळा ग्रामीन पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार दाखल केली असता त्यांनी गैरअर्जदार यांच्याविरूध्द कोणतीही कार्यवाही केली नाही. त्यामुळे आम्ही मा. पोलीस अधिक्षक ग्रामीण यांच्याकडे तक्रार सादर केली. परंतु त्यांनी देखील कोणतीही कार्यवाही केली नाही. गैरअर्जदार यांनी आमच्याकडुन व्यवहाराचा मोबदला स्विकारून ठरल्याप्रमाणे आमच्या हक्कात खरेदीखत नोंदवून न देता ति-हाईत इसमास आम्ही व्यवहार केलेली मिळकत विक्री केल्याने आमचे नुकसान झाले व माझे मालक प्रेम दरीयानानी यांचे नुकसान केले व फसवणुक केली. करीता मी न्यायालयात तक्रार दाखल केली आहे. या व्यतिरिक्त मला काही सांगावयाचे नाही.

DChandgude.........

( दत्तात्रय वसंत चांदगुड,)

**साक्षीदाराची सही.**

| दि. ३०/०१/२०२६. | **श्रवणोत्तर स्विकृत,** |
|---|---|
| साक्षीदारास वाचून दाखविले व बरोबर असल्याचे मान्य केले. | |
| 30.1.26 | |
| **(ए.एम.विभूते),**<br>सह. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,<br>वडगांव मावळ, पुणे. | **(ए.एम.विभूते),**<br>सह. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,<br>वडगांव मावळ, पुणे. |